**वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट**
**अंक ०८ वा**
**दिनांक १७/०२/२०२० ते दिनांक २२/०२/२०२०**
**पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.**
**/जावक क्रमांक:- २२२६ दिनांक:- २३/०४/२०२०**

---

**भाग- १ :-**
**बदली:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/पोनि जाधव व पोनि पाटील तैनात/१०८३/२०२० वाशिम दिनांक १४/०२/२०२० अन्वये पोलीस निरीक्षक, सेमनाथ जाधव, नेमणुक पोलीस स्टेशन कारंजा शहर व पोलीस निरीक्षक सतीश पाटील, नेमणुक पोस्टे धनज यांनी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांची प्रशासकीय कारणास्तव पुढील आदेशापर्यत त्यांचे नावे समोर दर्शविल्याप्रमाणे बंदोबस्ताकरीता तात्पुरते स्वरुपात तैनात करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नांव | नेमणुकीचे ठिकाण | तात्पुरते स्वरुपात तैनातीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव | पो.स्टे. कारंजा शहर | पो.स्टे. धनज |
| २. | पोलीस निरीक्षक सतिश पाटील | पो.स्टे. धनज | पो.स्टे. कारंजा शहर |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/पोउपनि.खुळे/ तात्पु.तैनात/११६६/२०२० वाशिम दिनांक :२०/०२/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास विनंतीवरुन बदलीवर वाशिम पोलीस घटकात नव्याने हजर झालेले असुन त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाण तात्पुरते पुढील आदेशापर्यत तैनाती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकाचे नांव | बदलुन आल्याचा घटक | जिल्हयात हजर दिनांक | तात्पुरते पुढील आदेशा पर्यंत तैनात |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. विठ्ठल पांडुरंग खुळे | अकोला | १०/०२/२०२० | पो.स्टे. वाशिम ग्रामीण |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:- पोअवा/पशा-१/पोनि.क-हाळे/बदली/कार्यमुक्त/२०२० /११९८ वाशिम दिनांक:- २०/०२/२०२० अन्वये मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे आदेश क्र अप/कक्ष-३/सार्व-बदल्या-२०१९/६६१ दि.११.०२.२०२० अन्वये पोलीस निरीक्षक बबन गंगाराम क-हाळे नेमणुक पोलीस नियंत्रण कक्ष वाशिम यांची वाशिम जिल्हयातुन पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे आस्थापनेवर बदली झाली आहे. पोलीस निरीक्षक बबन गंगाराम क-हाळे हयांना आदेश क्रमांक पोअवा/पशा-५/पोनि.क-हाळे/ पो.नि.लोणारे /सलंग्न / २१२ दिनांक ०९.०१.२०२० अन्वये पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे आस्थापनेवर पुढील आदेशापावेतो सलंग्न करण्यात आल्याने त्यांचे बदलीचे ठिकाणी हजर होण्यासाठी वाशिम जिल्हयाचे आस्थापनेवरुन दिनांक १८.०२.२०२० रोजी मध्यान्होत्तर स्थित कार्यमुक्त करण्यात येत आहे.

**पदोन्नती :- निरंक**
**नेमणुक :- निरंक**
**भाग-२ रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-२/अं.अ.रं.रो./से.नि./पो. कर्मचारी/११३७/२०२०, वाशिम दिनांक :-१७/०२/२०२० अन्वये खालील नमुद बडतर्फ पोलीस कर्मचारी त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांचे सेवापटामधील शिल्लक अर्जित रजेच्या अर्ध्या रजेचे रजा रोखीकरण करण्याची मंजुर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी नांव व पदनाम | तत्कालीन नेमणुक | मुळ वेतन | ग्रेड पे/- | मंजुर अर्जित रजा रोखीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १. | बढतर्फ पोहवा/३३३, मधुकर विठोबा अवगळे | पो.स्टे. रिसोड | १२०५० | २५०० | १५० दिवस |

२/- वर नमुद बडतर्फ पोलीस कर्मचारी यांचे सदर अंतीम रजा रोखीकरणाचे देयकावर अपर कोषागार अधिकारी वाशिम यांचे आक्षेप चिठ्ठी क्रमांक ८७०३/१८ दिनांक १३/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परकीय सेवा आधि निलंबन बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे प्रकरण ५ नियम ६६ व शासन निर्णय क्रमांक अरजा २४०१/८/सेवस-९, दि. १५/०१/२००१ मधील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये बडतर्फीचा उल्लेख नसल्याने नमुद बडतर्फ पोलीस कर्मचारी यांना रजा रोखीकरण देय ठरणार नाही असा आक्षेप घेतल्याने या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-२/अ.र.रो/से.नि./पो.कर्म/९७१९/१८ दि. ०६/११/२०१८ चा आदेश या आदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१ पोनि. बावनकर/अर्जित/११५८/२०२० वाशिम दिनांक १८/०२/२०२० अन्वये पोलीस निरीक्षक, धृवास बावनकर नेमणुक पोलीस नियंत्रण कक्ष यांना कार्यालीयीन आदेश क्रमांक :पोअवा/पशा-१ अर्जित रजा/पो. अधिकारी-०४/१८०६०/२०१९ दिनांक ०३/१०/२०१९ अन्वये १५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात आली होती. त्यांना दिनांक ०५/०२/२०२० रोजी पो.स्टे. रिसोड मार्फतीने सादर केलेल्या विनंती अर्जाला अनुसरुन त्यांची दिनांक ०५/०२/२०२० ते १९/०२/२०२० अशी एकुण १५ अर्जित रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/पोनि. शिवाजी ठाकरे/अर्जित/११९२/२०२० वाशिम दिनांक :२०/०२/२०२० अन्वये पोलीस निरीक्षक, शिवाजी ठाकरे नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांना कार्यालयीन आदेश क्रमांक: पोअवा/पशा-१/ अर्जित रजा/पो.अधिकारी/२०१९/१००२१ दिनांक ०७/०६/२०१९ अन्वये ३० दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात आली होती. त्यांनी दिनांक ११/०२/२०२० रोजी सादर केलेल्या विनंती अर्जाला अनुसरुन त्यांचे मंजुर अर्जित रजेपैकी दिनांक १८/०२/२०२० ते २७/०२/२०२० अशी एकुण १० दिवस अर्जित रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे. तसेच सदर रजेच्या कालावधीत त्यांचेकडील स्थानिक गुन्हे शाखा वाशिम चा कार्यभार तात्पुरता स्वरुपात पोनि.श्रीरात घुगे जिल्हा विशेष शाखा वाशिम यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

**परवानगी :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/ आलि/पोना-१०४५/सिरसाठ/११९०/२०२० वाशिम दिनांक २०/०२/२०२० अन्वये पोना/१०४५, प्रविण सुरेश सिरसाठ नेमणुक पो.स्टे. कारंजा ग्रामीण यांना त्यांचे विनंती नुसार पोलीस मुख्यालय वाशिम येथे तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यत देण्यात येत आहे.

**भाग -३ :-**

**बढती :- निरंक**

**पगार:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/से.नि. सपोनि.सै जमीर सै.कालु/सु.वे.नि/२०२०/११४८/ वाशिम दिनांक १७/०२/२०२० अन्वये सेवानिवृत्त सपोनि.सै.जमीर सै.कालु यांची कार्यालयीन आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/७ वा वेतन आयोग/वे.नि.सेवानिवृत्त/पो.अधि/२०१९, १८९७७ दिनांक २७/११/२०१९, १८९७७ दिनांक

२७/११/२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ व शासन अधिसुचना वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क.१/सेवस-९ दिनांक ३० जानेवारी २०१९, तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९/, दिनांक २०/०२/२०१९ मध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे स्तंभ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदात दिनांक ०१/०१/२०१६ रोजीचे सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रिक्स) मधील वेतनस्तर मध्ये वेतननिश्चिती करण्यात आली होती. सदर वेतन निश्चिती परिच्छेद क्र. १ मधील तफावतीनुसार दुरुस्ती करण्यात येवुन त्यांची स्तंभ " ब " मध्ये दर्शविल्या प्रमाणे सुधारित वेतननिश्चिती करण्यात येत आहे. सदरची वेतननिश्चिती लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, अमरावती यांच्या पडताळणीच्या अधिन राहुन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

| पदाचे नाव | विद्यमान वेतनसंरचना | | सुधारित वेतन मॅट्रिक्स |
|---|---|---|---|
| | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | वेतनस्तर |
| सहायक पोलीस निरीक्षक | पीबी - २ रु.९३००-३४८००/- | रु.४४०० /- | एस-१५ रु. ४१८००-१३२३००/- |

**भाग-४:-**

**बक्षिस:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आशा-४/बक्षिसअहवाल//मंजुर/पो.मु. वाशिम/११६०/२०१९, वाशिम दिनांक :- १८/०२/२०२० अन्वये मा. उपप्राचार्य, प्राचार्य राज्य राखीव पोलीस बल, प्रशिक्षण केंद्र नानवीज यांचे पत्र क्र.रारापोबल/प्रकेना/आशा-४/४८१६/२०१९, नानवीज, दिनांक १९/१०/२०१९ खालील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांना राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज येथील विविध सेवांतर्गत कोर्समधील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांनी शुक्रवारी दि. ११/१०/२०१९ रोजी समारंभ कवायती दरम्यान उत्कृष्ठरित्या गणवेश परिधान केलेबद्दल प्रोत्साहानार्थ, बक्षीस मंजुर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नांव, पदनाम व ब.नं. | नेमणुक | मंजुर बक्षीस |
|---|---|---|---|
| १. | मपोशि/१२४२, व्ही. पी. चव्हाण | पोलीस मुख्यालय, वाशिम | रु. १००/- व जिएसटी |

२/- सदर बक्षीस मुंबई पोलीस मॅनुअल भाग-१, १९५९ मधील नियम ३०० नुसार तसेच शासन निर्णय गृह विभाग क्रमांक जीओआर/०६९४/सीआर-२४/पोल-१० दि.३०/०८/१९९६ मधील मार्गदर्शनानुसार शिफारस करण्यात येत असुन, सदर बक्षीसाची रक्कम ही शासन निर्णय गृह विभाग क्रं.जी ओ आर-१३०५/प्र.क./५०९ पोल-१ दि.७/५/२००८ मधील मर्यादेपेक्षा जास्त नाही.

३/- सदर खर्च " २०५५-पोलीस १०९ (एक) (१) जिल्हा पोलीस दल " या शिर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मंजुर असलेल्या अनुदानातुन भागविण्यांत यावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- पोअवा/आशा-४/बक्षिसअहवाल//मंजुर/पो.मु. वाशिम/११६१/२०१९, वाशिम दिनांक :- १८/०२/२०२० अन्वये मा. उपप्राचार्य, प्राचार्य राज्य राखीव पोलीस बल, प्रशिक्षण केंद्र नानवीज यांचे पत्र क्र.रारापोबल/प्रकेना/आशा-४/५०८९/२०१९, नानवीज, दिनांक ०६/११/२०१९ खालील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांना राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज येथील विविध सेवांतर्गत कोर्समधील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांनी शुक्रवारी दि. ०१/११/२०१९ रोजी समारंभ कवायतीमध्ये उत्तम गणवेश परिधान केलेबद्दल प्रोत्साहनार्थ, बक्षीस मंजुर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नांव, पदनाम व ब.नं. | नेमणुक | मंजुर बक्षीस |
|---|---|---|---|
| १. | मपोशि/१२४२, व्ही. पी. चव्हाण | पोलीस मुख्यालय, वाशिम | रु. १००/- व जिएसटी |

२/-	सदर बक्षीस मुंबई पोलीस मॅनुअल भाग-१, १९५९ मधील नियम ३०० नुसार तसेच शासन निर्णय गृह विभाग क्रमांक जीओआर/०६९४/सीआर-२४/पोल-१० दि.३०/०८/१९९६ मधील मार्गदर्शनानुसार शिफारस करण्यात येत असुन, सदर बक्षीसाची रक्कम ही शासन निर्णय गृह विभाग क्रं.जी ओ आर-१३०५/प्र.क./५०९ पोल-१ दि.७/५/२००८ मधील मर्यादेपेक्षा जास्त नाही.

३/-	सदर खर्च " २०५५-पोलीस १०९ (एक) (१) जिल्हा पोलीस दल " या शिर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मंजुर असलेल्या अनुदानातुन भागविण्यांत यावा.

**भाग -५ :-**

**शिक्षा:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/विचौ/पी-६७(१)/ सपोउपनि-३१५, रमेश/१०७०/२०२० वाशिम दिनांक १४/०२/२०२० अन्वये सपोउपनि/३१५, रमेश सुदामा गलांडे, तत्कालीन नेमणुक नाहस, पथक, वाशिम सध्या नेमणुक पोलीस नियंत्रण कक्ष वाशिम हे नागरी हक्क संरक्षण पथक वशिम येथे कार्यरत असतांना आपण आपले वरिष्ठ अधिकारी सपोनि जी.जी. बायसठाकुर यांनी आपणास वेळोवेळी दिलेले व त्यांना अनुकुल नसलेले आदेशास अप्रत्यक्षपणे विरोध करत असुन कार्यालयीन कामकाजाबाबत सुचना वजा लेखी आदेश घेण्यास नकार दिला तसेच वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली. या आपल्या गैरवतुणुकीबाबत आपणास मुंबई पोलीस (शिस्त व अपील)१९५६ नियम ३ पोटनियम (२)मधील (५) च्या प्रधिकारणानुसार आपणास " **सक्त ताकीद** " ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**निलंबन :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौ/पी-६७(१) पोशि-७९१, जयेंद्र/ आदेश/११२९/२०२० वाशिम दिनांक १५/०२/२०२० अन्वये सदर प्रकरणी नमुद पोशि/७९१, जयेंद्र भिमराव शेगांवकर, तत्कालीन नेमणुक पो.स्टे. जऊळका, वाशिम सध्या नेमणुक पोस्टे मंगरुळपीर यांना त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयात त्यांना मा. न्ययालयाने सदर प्रकरणी निर्दोष मुक्त केले असुन त्यांना **दिनांक १६/११/२०१० ते ०१/०४/२०१४ पर्यतचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्याकाळ** म्हणुन गणण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोशि-८५३, सचिन गायकवाड/निलंबन/११६५/२०२० वाशिम दिनांक १८/०२/२०२० अन्वये ज्याअर्थि पोशि/८५३, सचिन गायकवाड, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम येथे नेमणुकीस असतांना दिनांक १७/०२/२०२० रोजी २०.०० ते ०८.०० वाजता पोस्टे वाशिम शहर अंतर्गत आपली बी.एम.-१, डयुटी लावण्यांत आली असता आपण सदर बी.एम.-१, डयुटीकरीता सदर नियंत्रण कक्ष, वाशिम येथे रवानगी टाकुन बी.एम.-१ डयुटीवर रवाना झाले परंतु त्यांचे दुसरे कर्मचारी नापोशि/४६१, राजेश, यांना एकटे सोडुन दिले व बी.एम.-१, गस्तीचे शासकीय वाहन क्र. एम.एच.३७ ए-४२५६ हे स्वत:च्या ताब्यात ठेवुन घेतले. त्यानंतर आपणास पोलीस नियंत्राण कक्ष, वाशिम येथुन नापोशि/१०७०, सरनाईक व नापोशि/४६१, राजेश यांना आपणास मोबाईलव्दारे संपर्क केली असता आपण सदर कॉलला कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच आपण सदर डियुटीवरुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहीलात. अशा प्रकारे आपण केलेल्या कसुरीचे गांभीर्यता विचारात घेता, या आपल्या गैरकृत्यामुळे पोलीस खात्यातील इतरत्र पोलीस कर्मचारी यांचेवर सुध्दा त्याचा विपरीत परिणाम हाऊ शकतो. अशाप्रकारे आपण केलेल्या गैरवर्तनुकीमुळे आपणास प्रस्तावित चौकशिचे अधिन राहुन आपणास मुंबई पोलीस शिक्षा व अपिले-१९५६ च्या नियम ३ चे पोटनियम (१) मधील (अ-२) च्या तरतुदीनुसार सदरचा आदेश निगामीत केल्याचे तारखेपासुन आपणास त्वरीत प्रभावाने निलंबीत करण्यात येत आहे.

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/प्रशिक्षण-MPIAS/प्रशिक्षण/पो.अधिकारी व पो.कर्मचारी/११९७/२०२० वाशिम दिनांक २०/०२/२०२० अन्वय- **"MPIAS (**MAHARASHTRA POLICE INFORMATION AND ANALYSIS SYSEM)" या नव्याने सुरु करण्यात येणा-या प्रकल्पाची पुर्व तयारीबाबत लिपीक वर्गीय कर्मचारी व Operational Traning For Police Staff यांचेकरिता दिनांक २३.०२.२०२० ते २९.०२.२०२० या कालावधीत जे.सी बोस ई लर्निग सेंटर पोलीस बिनतारी संदेश मुख्यालय पाषाण रोड पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाकरिता वाशिम पोलीस घटकातुन खालील नमुद पोलीस अधिकारी /कर्मचारी यांची निवड करण्यांत येत आहे.

| Sr.No | EMPLOYEE FULL NAME | DESIGNATION | MOBILE NO |
|---|---|---|---|
| १ | Shri. Ajaykumar Wadhawe | API CYBER / L.C.B WASHIM | ८९७५२७५१२१ |
| २ | Smt.Pallavi Wathore /१६८ | Police constable Computer Section | ७३७८४९७०९१ |
| ३ | Smt.JYOTI DHENDE /१०५७ | Police constable Cyber Cell Washim | ८३२९९६९१६३ |
| ४ | Shri Dipak Ghuge /१३४४ | Police constable Cyber CellWashim | ९०११५१५११५ |
| ५ | Shri AMOL KALMUNDRE/११२९ | Police constable Computer Section | ९५५२५२९२११ |

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/संगणक अर्हता-परिक्षा/५० वर्ष/सुट/११९१/२०२०, वाशिम दिनांक :-२०/०२/२०२० अन्वये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सेप्रनि-२००२/प्र.क्र.१४/०२/१२ दिनांक ०२/०९/२००३ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना दिनांक २८/०५/२०१८ मधील नियम ५ मधील तरतुदीच्या अधिन राहुन खालील नमुद सेवानिवृत्त/मयत पोलीस कर्मचारी यांना रकाना क्र ७ नुसार वयाची ५० वर्ष पुर्ण केल्याचे दिनांकापासुन खालील नमुद सेवानिवृत्त/मयत पोलीस कर्मचारी यांना संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासुन सुट देण्यात येत आहे.

या कार्यालयाचे जावक क्रमांक ११९५ दिनांक २०/०२/२०२० अन्वये अंक क्रमांक ५१ दि.१६/१२/२०१९ ते दि. २१/१२/२०२० हा प्रसिध्द करण्यात आला आहे.

या कार्यालयाचे जावक क्रमांक ११९४ दिनांक २०/०२/२०२० अन्वये अंक क्रमांक ५२ दि. २३/१२/२०१९ ते दि. २७/१२/२०१९ हा प्रसिध्द करण्यात आला आहे.

**Sd/-**
**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक
वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक ०८ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

------oooo------